# जयंतरावजी सहस्त्रबुद्धे : एक विलक्षण विज्ञानतपस्वी



विज्ञान भारतीचे राष्ट्रीय संघटन सचिव तथा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक श्री. जयंत श्रीकांत सहस्त्रबुद्धे यांनी शुक्रवार, २ जून रोजी पहाटे चार वाजता अखेरचा श्वास घेतला. दि. ३ सप्टेंबर २०२२ रोजी झालेल्या रस्ता अपघातापासून ते प्रकृतीशी निकराने झुंज देत होते. विज्ञान भारतीचे कार्य विश्वभरामध्ये प्रसारित करण्याचे महत्त्वपूर्ण योगदान जयंतरावांनी दिले. आपल्या अल्प अशा आयुष्यामध्ये विलक्षण काम करताना जयंतरावांनी भारतीय विज्ञान तथा भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील आंदोलनामध्ये भारतीय वैज्ञानिकांनी दिलेल्या योगदानावरील दृष्टिक्षेप यावर मौलिक कार्य केले. भारत सरकारच्या भारतीय स्वातंत्र्याच्या 'आझादी का अमृत महोत्सव' या कार्यक्रमांतर्गत जयंतरावांनी हा विषय जनमाणसापर्यंत पोहोचवण्यासाठी महत्त्वपूर्ण काम केले. जयंतराव अखेर पर्यंत विज्ञान भारतीच्या अनेक आयाम तसेच वेगवेगळ्या गतिविधिंना मार्गदर्शन करण्याचे व ते कार्यरत ठेवण्याचे कार्य करत होते. मा. जयंतरावांचा जन्म दि. १७ एप्रिल १९६६ रोजी गिरगाव (मुंबई) येथे झाला. त्यांचे वडील श्रीकांतजी सहस्त्रबुद्धे हे आजही संघ कार्याशी जोडलेले आहेत. त्यांची आई देखील राष्ट्रसेविका समितीची सक्रिय कार्यकर्ता राहिलेली आहे. जयंतरावांनी मुंबई विद्यापीठातून B.Sc. Tech (Electronics) पर्यंत शिक्षण घेऊन भाभा अ‍ॅटोमिक रिसर्च सेंटर या ठिकाणी काही काळ नोकरी केली. संपूर्ण सहस्त्रबुद्धे परिवार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जोडलेला असल्याने त्यांच्यावरील संघसंस्कार हे पूर्वीपासूनच रुजलेले होते आणि त्यातूनच १९८९ ला त्यांनी नोकरी सोडून पूर्णवेळ संघ प्रचारक बनून महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये संघ प्रचाराचे कार्य केले. गोवा राज्याच्या विभाग प्रचारकाच्या जबाबदारी नंतर २००१ ते २००९ पर्यंत ते कोकण प्रांताचे प्रांत प्रचारक राहिलेले आहेत. स्वर्गीय संघ प्रचारक श्री. हो. वे. शेषाद्री यांचेही ते सचिव राहिलेले आहेत. जयंतरावांकडे २००९ पासून विज्ञान भारतीच्या राष्ट्रीय संघटन सचिव पदाचे दायित्व होते. त्यांचे व्यक्तिमत्व नेहमी एक व्यासंगी असेच राहिलेले आहे. त्यांची कला, विज्ञान, स्वामी विवेकानंद आणि विज्ञान तसेच भारतीय वैज्ञानिकांचे जीवन ज्यामध्ये महिंद्र लाल सरकार, प्रफुल्लचंद्र राय, जगदीशचंद्र बोस, मेघनाद सहा, सर सी. व्ही. रमण इत्यादींवर व्याख्याने अजरामर आहेत. विज्ञान भारतीच्या सर्व गतिविधि, विद्यार्थी विज्ञान मंथन, टेक फॉर सेवा, आय.आय.एस.एफ., विश्ववेद विज्ञान संमेलन, भारतीय विज्ञान संमेलन, इ. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करत आहेत. विज्ञान भारतीचे अनेक आयाम आहेत, जसे वर्ल्ड आयुर्वेद फाउंडेशन, जी.आय.एस.टी. तथा ग्लोबल इंडियन सायंटिस्ट अँड टेक्नोक्रॅट फोरम, न्यासा तथा नॅशनल आयुर्वेद स्टुडंट्स युथ असोसिएशन, शक्ती इत्यादींना नवी दिशा तसेच मार्गदर्शन देण्याचे कार्य जयंतराव करत होते. सप्टेंबर २०१८ मध्ये जयंतरावांच्या परभणी येथील प्रवासाबद्दल एक आठवण येथे आवर्जून सांगावीशी वाटते. आपल्या व्यस्त कार्यक्रमातूनही वेळात वेळ

काढून जयंतरावांनी परभणी येथे भेट देऊन वेगवेगळ्या विज्ञान चळवळींचे कार्य जाणून घेतले. तसेच भविष्यामध्ये विज्ञानकार्य अजून प्रभावीरित्या कसे करता येईल याबद्दल मार्गदर्शन केले. मला त्यांचा प्रवासी प्रबंधक होण्याची संधी लाभली व हे व्यक्तिमत्व जवळून पाहता आले हे माझे भाग्यच. परभणी मधील दिवसभराच्या कार्यक्रमांमध्ये न कंटाळता परभणीतील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ यातील विविध विभागांना भेट देवून तज्ञ प्राध्यापक, शिक्षकांशी व शालेय विद्यार्थ्यांशी मनमोकळेपणाने संवाद साधला. परभणी मधील परभणी ॲस्ट्रॉनॉमिकल सोसायटी अंतर्गत होणाऱ्या वेगवेगळ्या विज्ञान कार्यक्रमांची माहिती घेऊन त्यामध्ये मोलाचे असे मार्गदर्शन जयंतरावांनी केले. तरुणालाही लाजवेल असा सळसळता उत्साह, लहानग्यांपासून मोठ्यांपर्यंत संवाद साधण्याची त्यांची हातोटी, कितीही तळागाळाचा कार्यकर्ता जरी असला तरी तो जयंतरावांशी अगदी मनमोकळेपणाने बोलू शकत असे. सर्वांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे आणि त्यानंतरच त्यावर त्या व्यक्तीच्या कलेने त्या शंकांचे समाधान करणे हे फक्त जयंतरावच करू शकत. अशा या विज्ञानात तपस्वीला परभणी एस्ट्रॉनॉमिकल्स सोसायटीच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली. जयंतरावांच्या निधनामुळे विज्ञान कार्यक्षेत्रामध्ये मोठी पोकळी निर्माण झाली आहे. जरी ती पोकळी भरून निघणारी नसली तरी जयंतरावांनी आखून दिलेल्या या विज्ञान कार्य प्रसारातील मार्गावर सर्व विज्ञान प्रेमींनी कार्य करून विज्ञान तळागाळापर्यंत सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य करावे व अखिल विश्वाला विज्ञानसंपन्न करावे हीच विज्ञान तपस्वीला परिपूर्ण श्रद्धांजली ठरेल.

◆

**प्रसाद वाघमारे**

सहसचिव, परभणी एस्ट्रोनॉमिकल सोसायटी, परभणी

*तरुण भारत वर्तमान पत्राच्या जयंत स्मृती विशेष पुरवणीत प्रकाशित झालेल्या लेखाचे पुनर्मुद्रण*

**समृद्धीसाठी शाश्वत तंत्रज्ञान!**

**डॉ. बावसकर टेक्नॉलॉजी (ॲग्रो) प्रा. लि.**

जर्मिनेटर, थ्राईवर, क्रॉपशाईनर, राईपनर, प्रोटेक्टंट–पी, प्रिझम, न्युट्राटोन, कॉटन थ्राईवर, हार्मोनी, पॅडी थ्राईवर, कल्पतरू (सेंद्रिय खत), सिद्धीविनायक मोरिंगा शेवगा, बॅटरी स्प्रेपंप

आधुनिक कृषी तंत्रज्ञानाने सर्वांगीण विकास घडविणारे
**'कृषी विज्ञान' मासिक**
वार्षिक वर्गणी रु. ३००/–

आपली कृषी विज्ञान केंद्रे

मुख्य कार्यालय : १६, कृषी उद्योग भवन नं. १, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे– ४११०३७.
☎ (०२०) २४२६१४९४ / २४२६०८९५ / ९९७५३०१३९५

☎ जळगाव : (०२५७) २२३४४७७, ☎ कोल्हापूर : (०२३१) २६५११७६, ☎ नारायणगाव : (०२१३२) २४४७०१ / ९९२२३४५५९४
☎ नाशिक : (०२५३) २६२०४५० / ९८६००७२५४३, ☎ सटाणा (नाशिक) : (०२५५५) २२३९३३ / ९६०४३४५७१२

● www.drbawasakar.com ● E-mail : info@drbawasakar.com ● Fb : Dr.BawasakarTechnologyAgroTech